**महाराष्ट्र शासन**

**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय**

२रा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

वाचा:- १) शासन अधिसूचना क्र.बीपीए.१०९३/४१२/इएक्ससी-३, दि.२३/०५/१९९६
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस.२१९३/१५९५९/अकरा, दि.२८/०८/१९९६.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस.२१९३/१५९५९/अकरा, दि.२२/०४/१९९७.
४) या कार्यायलाचे परिपत्रक क्र.डिएनएस ११९८/४३/चार, दि.०३/१२/१९९८
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस २१९३/१५९५९/अकरा, दि.१५/०७/२००४.
६) या कार्यालयाचे पत्र क्र. डिवायएस ११२००५/४०९५९/चार, दि.०२/०४/२०१९.
७) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिवायएस ११२००५/४०९५९/चार, दि.२०/०८/२०२०.
८) शासन निर्णय क्र.एमआयएस १०१८/प्र.क्र.२४६/राउशु-२, दि.२७/१०/२०२१.
९) गठीत डिनेचरंट तांत्रिक समितीची बैठक दि.०५/०७/२०२२ चे इतिवृत्त.
१०) गठीत डिनेचरंट तांत्रिक समितीची बैठक दि.०२/०८/२०२२ चे इतिवृत्त.
११) गठीत डिनेचरंट तांत्रिक समितीची बैठक दि.०५/०८/२०२२ चे इतिवृत्त.
१२) गठीत डिनेचरंट तांत्रिक समितीची बैठक दि.१०/११/२०२२ चे इतिवृत्त.

संदर्भ:- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस.२१९३/१५९५९/अकरा, दि.१५/०६/१९९६.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस.२१९३/१५९५९/अकरा, दि.०२/०७/१९९६.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस.२१९३/१५९५९/अकरा, दि.०३/०७/१९९६.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस.२१९३/१५९५९/अकरा, दि.१५/०७/१९९६.
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिएनएस २१९३/१५९५९/अकरा, दि.३०/०७/१९९६.
६) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डीएनएस ११२००१/५७६८८/अकरा, दि.०९/०८/२००१.
७) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डीएनएस-२११६/२६१२/अकरा, दि.१६/०१/२०१७.

विषय :- विशेष / साधारण विप्रकृत मद्यार्क बनवितांना
वापरावयाच्या डिनेचरंटच्या प्रमाणाबाबत.

# परिपत्रक

क्रमांक.डिवायएस ११२०१६/९२९९-ए/चार, (भाग-२), दिनांक. २२ नोव्हेंबर, २०२२

उपरोक्त शासन निर्णय दि.२७/१०/२०२१ नुसार शासनाने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे परिपत्रक क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा, दि.१५/०६/१९९६ मध्ये नमुद केलेल्या डिनेचरंट कडू पदार्थाच्या निश्चित केलेल्या प्रमाणामध्ये काळानुरुप बदल करणे आवश्यक आहे अथवा कसे ही, बाब तपासणे. तसेच, आंतरराष्ट्रीय धोरण विचारात घेऊन नविन डिनेचरंट / कडू पदार्थ निश्चित करणे. सध्याच्या अस्तित्वात असलेल्या डिनेचरंट / कडू पदार्थाबाबत पुनर्विचार करणे यानुसार मद्यार्काचे विप्रकृतीकरण्यासंबंधी नविन धोरण आखण्याचे निर्देश देऊन त्यासंबंधी तांत्रिक समिती गठीत केली. सदर समितीच्या उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविस्तर बैठका होऊन मद्यार्क विप्रकृतीकरणाबाबत

यापूर्वी या कार्यालयाच्या स्तरावरुन दिलेल्या उपरोक्त संदर्भिय अ.क्र. १ ते ७ सर्व सूचना अधिक्रमित करुन पुढील प्रमाणे नव्याने सुचना प्रसुत करण्यात येत आहेत.

**प्रस्तावना :-**

सन १९९४ मधील गठीत तांत्रिक समितीच्या सल्ल्यानुसार विभागाने जुन, १९९६ मध्ये मद्यार्कांचे विप्रकृतीकरण करतांना रंग व कडू पदार्थ मिश्रित करण्याचे बंधनकारक केले. त्यावेळी तांत्रिक समितीच्या सल्ल्यानुसार डिनेचरंटचे प्रमाण निश्चित करण्यात आले. तथापि, १९९६ नंतर बराच कालावधी उलटला असून यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबी मुळे १९९६ च्या सुचनामध्ये बदल करणे आवश्यक झाले आहे.

**अ)** भारतीय मानके संस्था (B.I.S.) यांनी Indian Standard Alcohol Denaturants-Specification IS ४११७:२००८(Second Revision) नुसार मद्यार्क विप्रकृतीकरण करण्याकरीता २००८ मध्ये नव्याने मानके निश्चित केली आहेत.

**ब)** १९९६ मधील निश्चित केलेल्या डिनेचरंटच्या यादीमधील पदार्थांबरोबर भारतीय मानके तसेच आंतरराष्ट्रीय वापर यानुसार विविध उद्योग नविन पदार्थांचा डिनेचरंट म्हणून समावेश करण्याबाबत मागणी करत असतात.

**क)** सर्वश्री. अर्स बायोफ्युअल विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या रिट याचिका क्र.८५४८/२००४ मधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश दि.१३/१२/२०१७ नुसार मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ मधील नियम २३ ते ६२ मा. उच्च न्यायालयाने खारीज केले. त्यामुळे विप्रकृत मद्यार्कावरील राज्य शासनाचे नियंत्रण गेल्याने मद्यार्काचे विप्रकृतीकरण योग्य व सुनिश्चित पध्दतीने होणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त बाबी तसेच तांत्रिक समितीच्या शिफारशी विचारात घेऊन विभागाच्या सध्याच्या वापरण्यात येणाऱ्या डिनेचरंटचा व भारतीय मानक संस्थेने निश्चित केलेल्या मानकांचा विचार करुन पुढील प्रमाणे सुधारित सूचना प्रस्तुत करण्यात येत आहेत.

I. **साधारण विप्रकृत मद्यार्क** ( ORDINARY DENATURED SPIRIT ) बाबत मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ मधील नियम-२ च्या उपनियम (८) मधील तरतूदी पूर्वी प्रमाणेच लागू राहातील.

II. **विशेष विप्रकृत मद्यार्क** ( SPECIALLY DENATURED SPIRIT ) बाबत मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ मधील नियम-२ च्या उपनियम १३ (a) मधील तरतूदीच्या अनुषंगाने आयुक्तांच्या अधिकारात विशेष विप्रकृत मद्यार्क तयार करण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या डिनेचरंट, रंग व कडू पदार्थ यांचे प्रमाण पुढील प्रमाणे विहित करण्यात येत आहे.

## तक्ता क्र.१ / Table No.1

(In every hundred bulk litres of S.D.S.)

| Sr. No. | Primary Denaturant Name | Percentage / Quantity | COLOUR (Any one) | BITTERANT (Any one) |
|---|---|---|---|---|
| 1 | Crotonaldehyde | 0.2% v/v (200 ml) | Crystal Violet 0.5 gram (5 ppm) OR Methylene Blue 1 gram (10 ppm) | Denatonium Saccharide 4 gram (40 ppm ) OR Denatonium Benzoate 4 gram ( 40 ppm ) |
| 2 | Acetone / E.M.K | 0.5% v/v (1/2 Litre) | | |
| 3 | Diethyl Phthalate | 0.5% v/v (1/2 Litre) | | |
| 4 | Acetaldehyde | 0.5% v/v (1/2 Litre) | | |
| 5 | Benzene or Toulene | 1 Litre. | | |
| 6 | Diethyl Ether | 1 Litre. | | |
| 7 | Diethyl Amine | 1 Litre. | | |
| 8 | Ortho Di-Chloro Benzene | 1 Litre. | | |
| 9 | Ethyl Acetate | 1 Litre. | | |
| 10 | Petroleum Ether | 1 Litre. | | |
| 11 | Chloroform | 5 Litre | | |
| 12 | Formaldehyde | 10 Litre | | |
| 13 | Formaldehyde अधिक Menthol | 2.5 Litre अधिक 2.5 Kg. | | |
| 14 | Formaldehyde अधिक Menthol | 1.25 Litre अधिक 4.5 Kg. | | |
| 15 | Turpentine oil | 5 Litre | | |
| 16 | Isopropyl Alcohol | 5 Litre | | |
| 17 | Cyclohexane | 2 Litre | | |
| 18 | Brucine OR Brucine Sulphate अधिक Tertiary butyl Alcohol | 10 gram अधिक 1/2 Litre, | | |
| 19 | Methyl Alcohol | 5% | | |

(PPM = Parts per million)

विशेष विप्रकृत मद्यार्क तयार करण्यासाठी उपरोक्त तक्ता क्र.१ नुसार प्राथमिक डिनेचरंट ची यादी सविस्तर करण्यात आली आहे. त्यामध्ये अनु. क्र.१ ते १९ मधील कोणतेही एक प्राथमिक डिनेचरंट विहित प्रमाणात वापरता येईल, तसेच प्रत्येक वेळी रंग व कडू पदार्थ टाकणे बंधनकारक आहे.

बेन्झिन (Benzene) हे कर्करोगजन्य (Carcinogenic) असल्याने बेन्झिन चा वापर संबंधीत घटकांनी शक्यतो करु नये.

उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.१९ मधील Methyl Alcohol चा वापर डिनेचरंट म्हणून करावयाचा असल्यास त्याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांची संयुक्तीक कारणमिमांसा देऊन पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

III. **विशेष विप्रकृत मद्यार्क- रंग व कडू पदार्थ वगळून** साखर उत्पादन प्रक्रियेत साखर कारखान्यात, औषध उत्पादक घटकाकडे, दारुगोळा कारखाना या ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या विशेष विप्रकृत मद्यार्कात कडू पदार्थ व रंग वापरणे योग्य होत नाही. त्यामुळे कडू पदार्थ व रंग वगळल्यास मद्यार्क विप्रकृत करण्याकरीता खालील तक्ता क्र.२ मधील डिनेचरंट चे प्रमाण विहित करण्यात येत आहे.

**तक्ता क्र.२ / Table No.2**

**(In every hundred bulk litres of S.D.S.)**

| **Sr. No.** | **Primary Denaturant Name** | **Percentage** |
|---|---|---|
| A | Benzene or Toulene | 3% |
| B | Diethyl Amine | 3% |
| C | Ortho Di-Chloro Benzene | 3% |
| D | Crotonaldehyde | 0.2% |
| E | Ethyl Acetate | 5% |
| F | Petroleum Ether | 3% |
| G | Acetone / E.M.K | 5% |
| H | Acetaldehyde | 5% |
| I | Diethyl Ether | 5% |
| J | Diethyl Phthalate | 3% |

उपरोक्त तक्ता क्र.२ मधील अ.क्र. A ते F मधील डिनेचरंट रंग व कडू पदार्थ वगळून विहित केलेल्या सुत्रात थेट वापरता येतील. तथापि, अ.क्र. G ते J वरील विहित केलेले डिनेचरंटचे प्रमाण एखाद्या वापरकर्ता उद्योगास आवश्यक असल्यास त्याबाबतची कारण मिमांसा देऊन सदर परिमाणासाठी आयुक्तांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

**३. उरोक्त प्रमाणे विहित केलेल्या डिनेचरंट व्यतिरिक्त इतर कोणत्याही डिनेचरंट व त्याचे सुत्र मद्यार्क विप्रकृत करण्यासाठी वापरता येणार नाही. मद्यार्कामध्ये विप्रकृत पदार्थ टाकतेवेळी तो विहित प्रमाणात टाकला जातो किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी ही आसवनीच्या प्रभारी अधिकाऱ्याची राहील.**

४. **डिनेचरंटचा नमुना विश्लेषणाबाबत-** सर्वश्री. अर्स बायोफ्युअल लि. या प्रकरणातील (रिट याचिका क्र.८५४८/२००४) आदेशानुसार विशेष विप्रकृत मद्यार्क वापरकर्ता घटकाकडे कोणतीही अनुज्ञप्ती (DS-V) नसल्याने त्यांना विशेष विप्रकृत मद्यार्क वितरीत करतांना या परिपत्रकातील सुचनांनुसार मद्यार्कांचे विप्रकृतीकरण झाले असल्याची विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आसवनीच्या प्रभारी अधिकारी यांनी विशेष विप्रकृत मद्यार्क वापरकर्ता घटक ज्यावेळी प्राथमिक डिनेचरंट, रंग व कडू पदार्थ आसवनीमध्ये आणेल त्यावेळी त्यांनी डिनेचरंट उत्पादक घटक किंवा पुरवठादार घटकाकडून शुध्दता प्रमाणपत्र (Purity Certificate) प्राप्त करणे बंधनकारक राहील. तसेच सदर नमुने रासायनिक शासकीय विश्लेषकाकडे विश्लेषणासाठी पाठवितांना नमुने / सॅम्पल सोबत शुध्दता प्रमाणपत्राची छायांकीत प्रत देखील पाठविणे आवश्यक आहे. सदर सॅम्पल हे द्रव्य पदार्थ असल्यास ३७५ मिली च्या बाटलीत पाठवावे. सदर सॅम्पल घन पदार्थ असल्यास किमान २० ते ३० ग्रॅम सॅम्पल रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात यावे. डिनेचरंट, रंग व कडू पदार्थ विश्लेषण अहवाल संबंधित शुध्दतेचा व पदार्थाचा प्राप्त झाल्यानंतर विप्रकृतीकरणासाठी वापरण्यात यावा. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित पदार्थ डिनेचरंट रुम मध्ये ६ महिनेपेक्षा जास्त कालावधी न वापरता राहील्यास त्याचा वापर करण्याआधी पुन्हा नमुने काढून विश्लेषणासाठी पाठवावे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर डिनेचरंट, रंग व कडू पदार्थ जर दुसऱ्या आसवनीत न्यायचे झाल्यास दुसऱ्या आसवनीच्या प्रभारी अधिकारी यांनी सदर पदार्थांचा पुन्हा विश्लेषण अहवाल प्राप्त करुन घ्यावा. ( सदर नमुने हे शासकीय रासायनिक विश्लेषक संचालक, हाफकीन संस्था, परेल, मुंबई—१२ यांच्या कडे किंवा वसंतदादा शुगर इंस्टिटयुट, मांजरी, पुणे यांच्याकडे पाठविण्याबाबत संबंधित नियमात तरतूद आहे.)

५. **विप्रकृत मद्यार्कांचे नमुने / सॅम्पल घेण्याबाबत-** मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ मध्ये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार मद्यार्कांचे विप्रकृतीकरण करण्यात येईल याची दक्षता सर्व संबंधीतांनी घ्यावी. तसेच उपरोक्त संदर्भिय परिपत्रक दि.०३/१२/१९९८ मधील निर्देशित प्रक्रियेचा पुनरुच्चार करण्यात येत आहे. "प्रथम टँकरमध्ये प्रत्येक कप्प्यात एकूण क्षमतेच्या सुमारे ५० टक्के म्हणजेच कप्प्यांची क्षमता प्रत्येकी ४००० लिटर्स असल्यास प्रत्येक कप्प्यात सुमारे २००० लिटर मद्यार्क भरण्यात यावे. त्यानंतर संबंधित औद्योगिक घटकास मंजूर असलेले डिनेचरंट, बिटरंट (कडू पदार्थ) व रंग विहित प्रमाणात प्रत्येक कप्प्यात मिसळावेत. त्यानंतर प्रत्येक कप्प्यात क्षमतेनुसार उर्वरित मद्यार्क भरण्यात यावे. आवश्यकतेनुसार प्रत्येक कप्प्यातील विप्रकृत मद्यार्क ढवळण्यात यावे व त्यानंतर प्रत्येक कप्प्यातून सुमारे ३७५ मिली लिटर नमुना घेण्यात यावा. ते सर्व नमुने एकत्र मिसळून त्याचे विभाजन ३७५ मि.ली. च्या ४ बाटल्यांमध्ये करावे. नमुना बाटल्यांच्या लेबलवर घटकाचे नाव, डिनेचरंटचे नाव, प्रमाण, बिटरंट, कलर याचे प्रमाण याचा स्पष्ट उल्लेख असावा. नमुने योग्य प्रकारे सील करावेत. नमुन्याच्या ४ पैकी दोन बाटल्या वाहन चालकाकडे देऊन त्याची पोच घेण्यात यावी. उर्वरित दोन बाटल्यापैकी १ बाटली आसवनी अनुज्ञप्तीधारकाकडे सोपवावी. दुसरी बाटली आसवनीच्या प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्याकडे सुरक्षित ठेवावी". तसेच सदर परिपत्रकातील उर्वरित निर्देश यथास्थिती लागू राहातील.

६. या कार्यालयाने यापूर्वी विशेष विप्रकृत मद्यार्क बनविण्यासाठी मद्यार्कमध्ये प्राथमिक डिनेचरंट, रंग व कडू पदार्थ वापरण्यास ज्या ज्या घटकांना सुट देण्यात आली आहे. त्यांना देण्यात आलेली सुट कायम राहील. आसवनी प्रभारी अधिकारी यांस या दिलेल्या सुट बाबत काही शंका असल्यास प्रकरणपरत्वे अधीक्षकांमार्फत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कार्यालयात प्रस्ताव सादर करावा.

उपरोक्त विहित करण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(कांतीलाल उमाप)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व आसवनी प्रभारी अधिकारी (मार्फत: अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क).
२. सर्व आसवनी अनुज्ञप्तीधारक. (मार्फत: अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क).
३. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

अधीक्षकांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व आसवनी प्रभारी अधिकारी, सर्व आसवनी अनुज्ञप्तीधारक, सर्व वापरकर्ते उद्योग तसेच त्यांच्या विप्रकृत मद्यार्क जिल्हयातील कार्यरत घटक यांच्या निदर्शनास आणावेत.

प्रत,

१. सर्व जिल्हाधिकारी.
२. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
३. संचालक, हाफकीन संस्था, परेल, मुंबई.
४. वसंतदादा शुगर इंन्स्टिट्युट, मांजरी, पुणे.
५. या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
६. अभिलेख शाखा ५ प्रती.
७. निवड नस्ती २ प्रती.

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर-एसडब्ल्यू/१०


# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे २३, १९९६/ज्येष्ठ २, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत


## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd May 1996

BOMBAY PROHIBITION ACT; 1949.

No. BPA. 1093/412/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Denatured Spirit Rules, 1959, should be brought into force at once; and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Bombay Prohibition Act, 1949 (Bom. XXV of 1949) (hereinafter referred to as "the said Act");

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (h2) of sub-section (*2*) of section 143 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Denatured Spirit Rules, 1959, namely :—

1. These rules may be called the Bombay Denatured Spirit (Amendment) Rules, 1996.

2. For sub-rule (8) of Rule 2 of the Bombay Denatured Spirit Rules, 1959, the following sub-rule shall be substituted, namely :—

"(8) 'Ordinary Denatured Spirit' means spirit, 100 litres of which consist 99 litres of spirit, 0·5 litres of Pyridine and 0·5 litres of light Caoutchoucine and (*i*) 1/2 gram ( 5 particles per million) of Crystal Violet and (*ii*) 5 grams (50 particles per million) of Denatonium Saccharide or Denatonium Benzoate mixed according to the process, described by the Commissioner, under condition 6 of the licence in Form DS-I".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. W. MOPKAR,
Deputy Secretary to Government.

---

*Note.*—The Bombay Denatured Spirit Rules, 1959 were last amended by Government Notification, Home Department No. BPA-1092/192/EXC-3, dated the 21st October, 1992 published in the *Maharashtra Government Gazette* (Extraordinary), Part-IV-B, dated the 21st October 1992, at p. 661-662.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ मे १९९६

मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९.

क्रमांक बीपीए. १०९३/४१२/इएक्ससी–३.—ज्याअर्थी, मुंबई विप्रकृत स्पिरीट नियम, १९५९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम, तावडतोब अंमलात आणावेत असे महाराष्ट्र शासनास वाटते आणि म्हणून मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम पंचवीस) (यात यानंतर ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १४३, पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रसिद्ध न करता नियम तयार करण्यात यावेत असे महाराष्ट्र शासनास वाटते, त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १४३, पोट-कलम (२), खंड (ह–२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, मुंबई विप्रकृत स्पिरीट नियम, १९५९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे ते असे :—

१. या नियमांना मुंबई विप्रकृत स्पिरीट (सुधारणा) नियम, १९९६ असे म्हणावे.

२. मुंबई विप्रकृत स्पिरीट नियम, १९५९ यातील नियम २ च्या पोट-नियम (८) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"(८) 'सर्वसाधारण विप्रकृत स्पिरीट' म्हणजे असे स्पिरीट की,—

ज्याच्या १०० लिटरमध्ये ९९ लिटर स्पिरीट, ०.५ लिटर पिरीडीन आणि ०.५ लिटर कौच्योसीन याचा समावेश असतो आणि (एक) क्रिस्टॉल व्हायलेटचा १/२ ग्रॅम (प्रति दशलक्ष ५ भाग) आणि (दोन) डिनॅटोनियम सॅचराईड किंवा डिनॅटोनियम बेन्झोएटचा ५ ग्रॅम (प्रति दशलक्ष ५० भाग) यांचे नमुना डीएस-१ मधील लायसनच्या शर्त क्र. ६ अन्वये आयुक्तांनी विहित केलेल्या प्रक्रीयेनुसार केलेले मिश्रण".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. वा. मोपकर,
शासनाचे उप सचिव.

---

टिप.—महाराष्ट्र शासन, गृह विभागाचे दिनांक २१ ऑक्टोबर, १९९२ चे क्र. वीपीए. १०९२/१९२/इएक्ससी-३ च्या अधिसूचनेनुसार मुंबई विप्रकृत स्पिरीट नियम, १९५९ मध्ये शेवटची दुरुस्ती करण्यात आली होती व तसे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात, भाग-४-ब चे पृष्ठ क्र. ६६१, ६६२ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

विषय- औद्योगिक मद्यार्काच्या विप्रकृतीकरणाबाबत.

....

वाचा:- १] आयुक्तालयाचे दि. १५ जून १९९६ चे क्र. डिएनएस. २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक.

२] आयुक्तालयाचे दि. २ जुलै १९९६ चे क्र. डिएनएस. २१९३/१५९५९/अकरा चे दुरुस्तीपत्रक.

३] आयुक्तालयाचे दि. ३ जुलै १९९६ चे क्र. डिएनएस. २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

४] आयुक्तालयाचे दि. १५ जुलै १९९६ चे क्र. डिएनएस. २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक.

५] आयुक्तालयाचे दि. ३० जुलै १९९६ चे क्र. डिएनएस. २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

.....

प रि प त्र क

क्रमांक. डिएनएस. २१९३/१५९५९/अकरा मुंबई २८ ऑगस्ट १९९६.

साधारण विप्रकृत मद्यार्काच्या विप्रकृतीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये रंग व कडू पदार्थाचे मिश्रण अनिवार्य करण्यात आले असून तद्-संबंधीची अधिसूचना शासनाने दि. २३ मे १९९६ चे क्र. बीपीए. १०९३/४१२/इएक्ससी. ३ अन्वये निर्गमित केली आहे. त्यानुसार मुंबई डिनेचर्ड स्पिरिट नियम, १९५९ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीमुळे साधारण विप्रकृत मद्यार्काच्या नविन व्याख्येनुसार १०० लिटर साधारण विप्रकृत मद्यार्कामध्ये ९९ लिटर स्पिरिट, ०.५ लिटर पिरीडीन आणि ०.५ लिटर कौच्यासिन ह्याच्यासह क्रिस्टल व्हायोलेटचा १/२ ग्रॅम [प्रति दशलक्ष ५ भाग] आणि डिनॅटोनियम सॅचराईड किंवा डिनॅटोनियम बेन्झोएटचा ५ ग्रॅम [प्रति दशलक्ष ५० भाग] ह्या पदार्थांचा समावेश अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्यानुसार अशा साधारण विप्रकृत मद्यार्काच्या वितरणाची अंमलबजावणी १ ऑगस्ट १९९६ पासून सुरु करण्यात आली आहे.

२. विशेष विप्रकृत मद्यार्काच्या विप्रकृतीकरणामध्ये अंतर्भाव करण्यात आलेले नविन प्राथमिक डिनेचरंटस आणि रंग व कडू पदार्थाचे प्रमाण ह्याचा तपशिल आयुक्तालयाच्या दि. १५ जून १९९६ च्या समक्रमांकाच्या परिपत्रकान्वये निर्दिष्ट करण्यात आलेला आहे व या नविन योजनेची अंमलबजावणी १ ऑगस्ट १९९६ पासून अंमलात आणण्या विषयीचे ~~उक्त~~ उक्त परिपत्रकात नमुद करण्यात आलेले होते. दरम्यान विशेष विप्रकृत मद्यार्कामध्ये रंग व कडू पदार्थाचे मिश्रण अनिवार्य केल्यामुळे अशा मद्यार्काचा उत्पादन प्रक्रीयेमध्ये वापर केल्यास उत्पादन खर्चात होणारी अतिरिक्त वाढ आणि प्रामुख्याने उत्पादन प्रक्रीयेनंतर

....२/-....

रंग व कडू पदार्थ मिश्रीत शिल्लक राहणारे पदार्थ [effluent- Charcoal cake etc. ] हयाच्या निपटारा करण्यातील अडचणी, डिनेचरंट व तांत्रिक सल्लागार समिती समोर पुन्हा एकबार सादर करण्यासाठीची संधी मिळण्याबाबत "ऑल इंडिया अल्कोहोल बेस्ड इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट असोसिएशन", "परफ्यूमर्स ल्फेवर्स असोसिएशन ऑफ इंडिया" आणि औद्योगिक मद्यार्काचा वापर करणा-या इतर काही घटकांनी निवेदन सादर केली. त्यानुसार आयुक्तालयाच्या उपरिनिर्दिष्ठ दि. ३० जुलै १९९६ च्या परिपत्रकान्वये या नविन विप्रकृतीकरणाची अंमलबजावणी ३१.८.१९९६ पर्यंत नंतर करण्याचे सूचीत केले.

३. डिनेचरंट आणि तांत्रिक सल्लागार समितीच्या दि. २१ ऑगस्ट १९९६ च्या बैठकीमध्ये औद्योगिक मद्यार्काचा वापर करणा-या उपरोक्त घटकांनी सादर केलेली उत्पादन प्रक्रीयेची माहिती, प्रक्रीया-पॅरामिटर्स, प्लॅन्ट मशिनरीची रचना इत्यादीच्या अनुषंगाने शास्त्रीय सुत्र व तांत्रिक निकषाच्या आधारे साधक-बाधक चर्चे अंती डिनेचरंट व तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारसींच्या अनुषंगाने खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

[अ] विशेष विप्रकृत मद्यार्कमध्ये सर्व घटकांना रंगाचा वापर करण्यास पुढील आदेश होईपर्यंत सूट देण्यात येत आहे. फक्त सर्वश्री. रोहा डायकेम, रोहा, जि. रायगड व सर्वश्री. सारिगांव ऑरगॅनिक्स, जि. रायगड या घटकांसाठी विशेष विप्रकृत मद्यार्कमध्ये रंगाचा वापर करणे अनिवार्य राहील.

[ब] फूड कलरचे उत्पादन करणारे सर्वश्री. रोहा डायकेम, जि. रायगड आणि सुगंधी द्रव्ये, अगरबत्ती यासाठी आवश्यक असणारे डायइथाईल थॅलेटचे उत्पादन करणारे सर्वश्री. सारिगांव आरगॅनिक्स, जि. रायगड या दोन घटकांना विशेष विप्रकृत मद्यार्कमध्ये कडू पदार्थाचा वापर करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

रंग अथवा कडू पदार्थाच्या संदर्भात उपरोक्त [अ] व [ब] संवर्गातील विशेष घटकांसाठी आयुक्तालयाच्या दि. १५ जून १९९६ चे समक्रमांकाच्या परिपत्रकातील परिच्छेद ४ मध्ये विशेष विप्रकृत मद्यार्कासाठी नमुद केलेल्या प्राथमिक डिनेचरंटच्या प्रमाणाचा वापर करणे अनिवार्य राहील. मात्र [अ] व [ब] मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्वश्री. रोहा डायकेम आणि सारेगांव ऑरगॅनिक्स यांना रंगाचा व इतरांना कडू पदार्थाचा वापर अनिवार्य राहील.

[क] आयुक्तालयाच्या दि. १५ जून १९९६ चे समक्रमांकाच्या परिपत्रकातील परिच्छेद ४ व ६ मध्ये नमुद केलेल्या ८ प्राथमिक डिनेचरंटचा वापर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. या प्राथमिक डिनेचरंटस मध्ये २ अतिरिक्त प्राथमिक डिनेचरंटचा अंतर्भाव खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्राथमिक डिनेचरंटचे नांव | परिच्छेद ४ साठीचे प्रमाण | परिच्छेद ६ साठीचे प्रमाण. |
|---|---|---|---|
| [आय] | इथील ॲसिटेट | १ लिटर | ५ टक्के |
| [जे] | पेट्रोलियम इथर | १ लिटर | ३ टक्के. |

[ख] सर्वश्री. सिप्ला, जि. रायगड, सर्वश्री. ग्लॅक्सो, ठाणे व सर्वश्री. डूफार इंटरफ्रॅन लि. ठाणे हे औषधोत्पादन करणारे घटक आयुक्तालयाच्या उपरिर्निदिष्ठ दि. १५ जून १९९६ च्या परिपत्रकातील परिच्छेद ६ मध्ये नमुद केलेले ८ प्राथमिक डिनेचरंट पैकी कोणत्याही डिनेचरंटचा वापर करीत नसून मेथनॉलचा वापर करीत आहेत. परंतू शासनाने प्राथमिक डिनेचरंट म्हणून मेथनॉलचा वापर करण्यास बंदी घालण्याचे धोरण आहे. त्यामुळे घटकांनी विहीत केलेल्या ८ डिनेचरंट पैकी कोणत्याही डिनेचरंटचा वापर उत्पादन प्रक्रीयेमध्ये करण्याबाबत चाचण्या घेतल्या पाहिजेत आणि या ८ प्राथमिक डिनेचरंट पैकी जो डिनेचरंट सुलभपणे वापरण्याजोगा आहे किंवा अजून इतर कोणत्या डिनेचरंटचा वापर करणे शक्य असल्यास त्याप्रमाणे ३१.१२.१९९६ पर्यंत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांची परवानगी घ्यावी. दरम्यान ३१.१२.१९९६ पर्यंत या घटकांना मेथनॉलचा वापर करण्यास अंतरिम परवानगी देण्यात येत आहे. या कालावधीनंतर मेथनॉलचा वापर पूर्णपणे बंद करण्यात येईल.

[ग] सर्वश्री. इंडस्ट्रीयल सॉल्व्हंट ॲन्ड केमिकल्स, ठाणे:- घटकाच्या डायइथाईल ॲनिलीन, मोनो इथाइल ॲनिलीन या पदार्थांच्या सध्याच्या उत्पादनासाठीची यंत्र सामुग्रीची आखणी व प्रचलित उत्पादन प्रक्रीयेमुळे रंग व कडू पदार्थांचा काही प्रमाणातील अंश

रिॲक्टरमध्ये जाण्याची संभाव्यता असून त्या जोगे कॅटलिस्टला बाधा येण्याची शक्यता आहे. सध्याच्या उत्पादन प्रक्रीयेमध्ये व यंत्र सामुग्रीच्या आखणीमध्ये थोडया प्रमाणात सुधारणा केल्यास रंग व कडू पदार्थाचा वापर मद्यार्कामध्ये करता येणे शक्य आहे. त्यानुसार १ वर्षाच्या कालावधीमध्ये घटकाने यंत्र सामुग्री, स्ट्रक्चरल टेक्नॉलॉजी उत्पादन प्रक्रीयेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात. दरम्यानच्या कालावधीमध्ये घटकास विशेष विकृत मद्यार्कामध्ये रंग व कडू पदार्थ वापरण्यापासून सूट देण्यात येत आहे. परंतु या घटकाला ५ टक्के डायइथाईल व इथर या प्राथमिक डिनेचरंटचा वापर करणे अनिवार्य राहील.

जिल्हा अधिकाऱ्यांनी उपरोक्त अवगत करुन त्यांच्या

४. सर्व संबंधित डिएस.५ अनुज्ञप्तीधारकांच्या अनुज्ञप्तीवर आवश्यक असणाऱ्या दुरुस्तींची नोंद घेण्यात यावी.

५. परिपत्रकाची पोच द्यावी.

सुबोध कुमार

[ सुबोध कुमार ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१] सर्व जिल्हाधिकारी, सस्नेह.
२] सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
३] सर्व सह-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
४] सव उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
५] संचालक [अं. व द] राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबइ.
६] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
७] सर्व आसवनींना.
८] सर्व प्रभारी अधिकारी आसवनी.
९] निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, शिवडी बजार, मुंबई.
१०] सहाय्यक संशोधक, राज्य उत्पादन शुल्क रासायनिक प्रयोगशाळा, चुनाभट्टी, मुंबई-२२.
११] अभिलेखा शाखा ५ प्रतीसह.

READ: Commissioner's Circular No. DNS. 2193/15959/XI dated 15th June, 1996.

No. DNS. 2193/15959/XI Mumbai, 22nd April, 1997.

## CIRCULAR

In Commissioner's Circular quoted above, 5 gram ( 50 ppm) bitterent ( either denatonium Saccharide or denatonium Benzoate) has been made compulsory in SDS. M/s. Indian Organic Chemical's request to reduce the proportion of denaturant from 50 PPM to 10 PPM was considered by Denaturant and Technical Advisory Committee for the State of Maharashtra in its meeting held on 6/3/97. The recommendations of the Committee were considered by the Commissioner and it is hereby permitted that the proportion of bitterent be reduced from 50 PPM i.e. 5 gram to 40 PPM, i.e. 4 gram in all Specially Denatured Spirits in addition to the approved primary denaturant.

S.W. Mopkar 21/4/97

( S.W.MOPKAR )
Commissioner of State Excise,
Maharashtra State, Mumbai.

To,

1) All Collectors w.cs.
2) All D.D.C. of State Excise
3) All Joint Commissioners of State excise
4) All Dy. Commissioners of State Excise.
5) All Superintendents of State Excise ( 10 copies)
6) All Desk Officers in this office.
7) All Distilleries in the State.
8) All State Excise Officers I/c Distilleries
9) Inspector of State Excise I/c Sewree Warehouse, Mumbai- 400 015.
10) Record Section with 5 spare copies.
11) Director ( Enforcement & Vigilance) of State Excise, M.S., Mumbai.
12) Research Asstt. of State Excise, Chemical Laboratory, Chunabhatti, Mumbai.

B: 21.4.

महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

---

वाचले:- १] या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिएनएस १६८६/तीन दि.२८.७.१९८७
२] क्रमांक बीपीए १६८८/२१४८/तीन दिनांक ९.९.८१
३] क्रमांक बीपीए ११९४/५३६९४/दीव दमण/चार दिनांक ६.२.१९९६

---

# परिपत्रक

क्रमांक:- डिएनएस ११९८/४३/चार मुंबई, ३ डिसेंबर १९९८

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिएनएस १६८६/तीन दिनांक २८.७.८७ नुसार विशेष विप्रकृत मद्यार्काच्या टँकरमध्ये विप्रकृतीकरण केल्यानंतर टँकरच्या प्रत्येक कप्प्यातून नमूने काढण्याबाबत सुचना निर्गमित केलेल्या आहेत. परंतु सदर नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येत नाहीत. त्यामुळे नमुने काढण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच नमुन्यांची तपासणी होत नसल्याने डिनेचरंटस् न मिसळण्याच्या गैरप्रकारास वाव मिळू शकतो. सदर गैरप्रकार टाळण्यासाठी यापुढे टँकरमध्ये विशेष विप्रकृतीकरण करण्याबाबत व नमुने घेण्याबाबत खालीलप्रमाणे पध्दत विहीत करण्यात येत आहे.

२. प्रथम टँकरमध्ये प्रत्येक कप्प्यात एकूण क्षमतेच्या सुमारे ५० टक्के म्हणजेच कप्प्यांची क्षमता प्रत्येकी ४००० लिटर असल्यास प्रत्येक कप्प्यात सुमारे २००० लिटर मद्यार्क भरण्यात यावे. त्यानंतर संबंधित औद्योगिक घटकास मंजूर असलेले डिनेचरंट, बिटरंट व रंग विहीत प्रमाणात प्रत्येक कप्प्यात मिसळावेत. त्यानंतर प्रत्येक कप्प्यात क्षमतेनुसार उर्वरित मद्यार्क भरण्यात यावे. आवश्यकतेनुसार प्रत्येक कप्प्यातील विप्रकृत मद्यार्क ढवळण्यात यावे व त्यानंतर प्रत्येक कप्प्यातून सुमारे ३७५ मिलीलिटर नमुना घेण्यात यावा. ते सर्व नमुने एकत्र मिसळून त्याचे विभाजन ३७५ मि.ली.च्या ४ बाटल्यांमध्ये करावे. नमुना बाटल्यांच्या लेबलवर घटकाचे नांव, डिनेचरंटचे नाव व प्रमाण, बिटरंग, कलर यांचे प्रमाण यांचा स्पष्ट उल्लेख असावा. नमुने योग्य प्रकारे सील करावेत. नमुन्यांच्या ४ पैकी दोन बाटल्या वाहन चालकाकडे देऊन त्याची पोच घेण्यात यावी. उर्वरित दोन बाटल्यांपैकी १ बाटली आसवनी अनुज्ञप्तीधारकाकडे सोपवावी. दुसरी बाटली आसवनीच्या ~~xx~~ प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्याकडे सुरक्षित ठेवावी.

३. ज्या डिएस-५ अनुज्ञप्तीधारकाकडे डिनेचरंट तपासण्याची सोय आहे

..२..

त्या अनुज्ञप्तीधारकांने त्याचे अनुज्ञप्तीच्या जागेत टॅंकर पोहचताच टॅंकरमधील मद्याच्या दोन नमुन्यापैकी एका नमुन्याचे विश्लेषण करावे व डिनेचरंटचे प्रमाण किंवा मद्यार्काची तीव्रता यामध्ये तफावत आढळल्यास त्याची माहिती तेथील संबंधित राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांना व जिल्हा अधीक्षकांना द्यावी. राज्य उत्पादन शुल्कविभागाच्या अधीक्षकाने ज्या आसवनीमधून मद्यार्काचे वितरण केले गेले त्या आसवनीशी थेट संपर्क साधून आसवनीच्या प्रतिनिधीस डिएस-५ अनुज्ञप्तीच्या ठिकाणी बोलावून घेऊन व दुस-या बंद नमुन्याचे पृथःकरण सदर प्रतिनिधी समक्ष व राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांच्या समक्ष करावे. जर नमुन्यात व टॅंकरमधील मद्यार्कात तफावत आढळल्यास टॅंक व त्यामधील मद्यार्क जप्त करुन कार्यवाही करावी. टॅंकरमधील मद्यार्क नमुन्यातील मद्यार्काप्रमाणे असल्यास डीएस-५ घटकाने मद्यार्क उतरुन घ्यावे व उर्वरित नमुना संचालक, हाफकीन इंस्टीटयूट, परेल किंवा राज्य उत्पादन शुल्क प्रयोगशाळा, चुनाभट्टी, सायन, मुंबई-२२ येथे पाठवावा.

४. अधीक्षक, उपअधीक्षक तसेच उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क हे ज्यावेळेस आसवनीस भेट देतील त्यावेळेस त्यांनी एकूण जमा नमुन्यापैकी कोणतेही १० टक्के नमुने निवडून ते पृथःकरणासाठी वरील परिच्छेदातील प्रयोगशाळेकडे पाठवावेत व त्याचे पृथःकरण शुल्क आसवनीकडून वसूल करण्यात यावे.

५. आसवनीकडे जमा असलेले नमुने मद्यार्कात डिनेचरंट मिसळण्याची प्रयोगशाळेकडून खात्री होईपर्यंत किंवा नमुना घेतल्याच्या तारखेपासून सहा महिने यापैकी जे आधी होईल तोपर्यंत नमुने सुरक्षित ठेवावेत.

६. ज्या डीएस-५ अनुज्ञप्तीधारकाकडे डिनेचरंट तपासण्याची व्यवस्था नाही त्यांनी हाफकीन इंस्टिटयूट, परेल किंवा राज्य उत्पादन शुल्क प्रयोगशाळा, चुनाभट्टी, सायन, मुंबई-२२ येथे नमुने तपासणीसाठी पाठवावेत.

७. कार्यकारी अधिका-यांनी डीएस-५ घटकांना अचानक भेटी देऊन शक्यतो टॅंकरमधील मद्यार्क उतरुन घेताना नमुने घ्यावेत व भेटीच्या वेळी टॅंकर आला नसल्यास साठवणूक टाकीतून नमुने घ्यावेत. अधीक्षकांनी कार्यकारी अधिकारी व भरारी पथकाच्या अधिका-यांना कार्यक्षेत्रातील अनुज्ञप्त्यांची संख्या व अधिका-यांचा कामाचा बोजा विचारात घेऊन दरमहा किती नमुने x घ्यावेत हे निश्चित करावे.

८. नमुन्यातील विश्लेषणामध्ये तफावत आढळल्यास चौकशी डीएस-५ अनुज्ञप्ती असलेल्या जिल्हयाच्या अधीक्षकांनी पूर्ण करुन कारण/जबाबदारी निश्चित करुन

सविस्तर अहवाल पाठवून या कार्यालयाचे आदेश प्राप्त करावेत.

९. प्रयोगशाळेकडे पाठवावयाचे नमुन्याचे फीचे बाबतीत परिपत्रक क्रमांक बीपीए/चार[एक] दिनांक ४.९.१९९७ अन्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत त्या लागू राहतील.

वरील सुचनांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

[ अजितकुमार जैन ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१] सर्व जिल्हाधिकारी, यांना सस्नेह अग्रेषित.

२] या कार्यालयातील सर्व सह आयुक्त,

३] सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,

४] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,

५] सर्व आसवन्या, व त्यावरील राज्य उत्पादन शुल्क अधिकारी.

६] सर्व डीएस-५ [बल्क कंझ्युमर्स] घटक.

७] राज्य उत्पादन शुल्क रासायनिक प्रयोगशाळा, व्ही. एन. पूरव मार्ग, चूनाभट्टी, सायन, मुंबई ४०० ०२२.

८] संचालक, हाफकीन इन्स्टिट्युट फॉर ट्रेनिंग, रिसर्च अॅन्ड टेस्टींग, आचार्य दोंदे मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२.

९] या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.

१०] अभिलेख शाखा [५ प्रती]

महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, २ रा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
Email :- excisehoa@vsnl.net / excisebo@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt. Commr: 22660152, Dy.Commr:26265569, FAX No. 22662370

विषय : वाहनांच्या इंधनात मिश्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या इथेनॉलच्या विप्रकृतीकरणाबाबत.

वाचा :-१) आयुक्तालयाचे दि.१५ जून, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक
२) आयुक्तालयाचे दि.२ जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे दुरुस्तीपत्रक
३) आयुक्तालयाचे दि.३ जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक
४) आयुक्तालयाचे दि.१५ जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक
५) आयुक्तालयाचे दि.३० जुलै, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक
६) आयुक्तालयाचे दि.२८ ऑगस्ट, १९९६ चे क्र.डिएनएस २१९३/१५९५९/अकरा चे परिपत्रक

परिपत्रक

क्रमांक डिएनएस २१९३/१५९५९/अकरा मुंबई १५ जुलै, २००४.

केंद्र शासनाच्या निर्णयानुसार सध्या राज्यात ५% इथेनॉलचे ( जलरहीत मद्यार्काचे ) मिश्रण करुन ते वाहनांच्या इंधनात वापरण्यात येत आहे. सदर इथेनॉलची निर्मिती विशेष विप्रकृत मद्यार्काचे "मॉलेक्युलर सीव्ह" किंवा "एझिओट्रोपिक" पध्दतीने पुनःउर्ध्वपतन करुन केली जाते. विशेष विप्रकृत मद्यार्कामध्ये, डिनेचरंट कमिटीने मान्यता दिल्यानुसार उपरोक्त अ.क्र.१ अन्वये विहित केलेले डिनेचरंटस् व कडू पदार्थ ठराविक प्रमाणात वापरणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकानुसार प्रति १०० लि. मद्यार्कात १ लिटर "बेंझिन" किंवा ०.२% "क्रोटोनलडिहाईड" हे प्राथमिक डिनेचरंट व ४ ग्रॅम "डिनोटोनियम सॅक्रराईड" / "बेन्झोएट" हे कडू पदार्थ विहित केले आहेत.

"इथेनॉल" उत्पादकांच्या अडीअडचणींबाबत दि.१८.५.२००४ रोजी मा.उप-मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली इथेनॉल उत्पादकांची व "इथेनॉल" मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया" चे पदाधिकारी व प्रतिनिधी यांची सभा झाली. या बैठकीत इथेनॉल उत्पादकांनी इथेनॉलसाठी वापरावयाच्या विप्रकृत मद्यार्कातील डिनेचरंट विषयी पुढील अडचणी प्रामुख्याने नमूद केल्या.

१) विप्रकृत मद्यार्कात ०.२% क्रोटोनलडिहाईड किंवा १% बेंझीन वापरल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात व आवश्यकतेपेक्षा अधिक बेंझिन वापरल्यामुळे ते वाया जाते व उत्पादक घटकांचे आर्थिक नुकसान होते. शिवाय क्रोटोनलडिहाईड बाजारात लवकर उपलब्ध होत नाही व ते महाग देखील आहे. त्यामुळे विप्रकृत मद्यार्कात १% बेंझीन ऐवजी ०.५% "बेंझिन" वापरण्यास परवानगी देण्यात यावी.

२) तसेच आर्थिक दृष्ट्या परवडण्यासाठी व उपलब्धतेच्या दृष्टीकोनातून "क्रोटोनलडिहाईड" ऐवजी "ब्रुसीन" या पदार्थाचा डिनेचरंट म्हणून वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.

या संदर्भात दि.४.६.२००४ रोजी डिनेचरंट व तांत्रिक सल्लागार समितीची बैठक बोलविण्यात आली. त्यात समितीने मोटारींच्या इंधनात वापरावयाच्या "इथेनॉल" साठी उपयोगात आणावयाच्या डिनेचरंटसबाबत खालीलप्रमाणे शिफारसी केल्या आहेत.

२) या घटकांना विप्रकृत मद्यार्कात रंग वापरण्यापासून सूट देता येईल.

३) कडू पदार्थ म्हणून डिनेटोनियम बेंझोएट किंवा सॅकराईड सध्याच्या ४० पीपीएम ऐवजी २० पीपीएम म्हणजे प्रत्येक १०० लिटर मद्यार्कात २ ग्रॅम या प्रमाणात वापरता येईल.

मात्र "ब्रुसीन" या पदार्थाचा डिनेचरंट म्हणून वापर करावयाचा झाल्यास फार मोठया परिमाणात ( ४ पीपीएम ऐवजी २०० पीपीएम) तो करावा लागेल व एवढया मोठया प्रमाणात हा घनपदार्थ पेट्रोल मध्ये वापरणे तांत्रिक दृष्टया योग्य होणार नाही. त्यामुळे "ब्रुसीन" या पदार्थाचा वापर डिनेचरंट म्हणून करावयास परवानगी देता येणार नाही.

डिनेचरंट व तांत्रिक सल्लागार समितीच्या या शिफारशी विचारात घेऊन वाहनाच्या इंधनामध्ये (पेट्रोलमध्ये) मिसळण्यात येणाऱ्या इथेनॉल मध्ये विप्रकृतीकरणासाठी इतर मान्यता प्राप्त डिनेचरंट व्यतिरिक्त खालीलप्रमाणे डिनेचरंटस् व कडू पदार्थांचे प्रमाण विहित करण्यात येत आहे.

अ) प्राथमिक डिनेचरंट "बेन्झिन" किंवा "टोलीन" - ०.५% म्हणजेच ०.५ लिटर प्रति १०० ब.लि.मद्यार्कात वापर करता येईल.

ब) रंग - विप्रकृत मद्यार्कात वापरण्यास सूट देण्यात येत आहे.

क) कडू पदार्थ - "डिनेटोनियम बेन्झोएट" किंवा "डिनेटोनियम सॅकराईड" २० ppm म्हणजेच २ ग्रॅम प्रति १०० ब.लि. मद्यार्कात या प्रमाणात वापरता येईल.

ड) "ब्रुसीन"च्याबाबत इथेनॉल उत्पादकांनी ४ ग्रॅम प्रमाण वापरण्यासाठी विनंती केली असली तरी डिनेचरंट समितीने सदर प्रमाण २०० ppm असे ठरविले असून अंतर्गत ज्वलन होणाऱ्या इंजिनामधील पेट्रोलमध्ये इतक्या मोठया प्रमाणात घन पदार्थाचा वापर योग्य होणार नाही असे मत दिले असल्यामुळे "ब्रुसीन" या पदार्थाचा डिनेचरंट म्हणून वापर करण्यास परवानगी नाही.

उपरोक्त डिनेचरंट व कडू पदार्थांचे विहित प्रमाण फक्त वाहनांच्या इंधनात वापरण्यासाठी निर्मिती करावयाच्या इथेनॉलकरिता व त्यांत वापरात येणाऱ्या विप्रकृत मद्यार्ककरिता मर्यादित राहील अन्य "इथेनॉल" व्यतिरिक्त उत्पादनाकरिता या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सूचना जशाच्या तशा लागू राहतील.

(स्वाक्षरी) १५/७

( विजय भै.माथनकर )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व इथेनॉल निर्मिती करणारे घटक
२. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह
३. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
४. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
५. इथेनॉल निर्मिती करणाऱ्या घटकावरील प्रभारी अधिकारी
६. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
७. या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी
८. अभिलेख शाखा ( ५ प्रती )

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३.

प्रति,

सर्व विभागीय उपआयुक्त/अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क.

क्रमांक:- डिवायएस ११२००५/४०९५९ /चार

मुंबई, दि. 2 एप्रिल, २०१९.

विषय:- याचिका क्र.८५४८/२००४ मधील मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.१३.१२.२०१७ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ मधील नियम २३ ते ६२ रद्द झाल्याने त्याअनुषंगाने न्यायालयीन प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत.
संदर्भ:- या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.१९.३.२०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सर्वश्री अर्स बायोफ्युअल प्रा.लि., या नमुना "I" व डिएस-५ अनुज्ञप्तीधारकाने मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.८५४८/२००४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.१३.१२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ मधील नियम २३ ते ६२ रद्द केलेले आहेत. त्यामुळे विप्रकृत मद्यार्क बाळगणे, वापर, विक्री, आयात, निर्यात आणि वाहतुक यावर राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. तसेच विप्रकृत मद्यार्कांसाठी डिएस-१ अनुज्ञप्ती वगळता राज्याची इतर कोणतीही अनुज्ञप्ती घेण्याची आवश्यकता राहिलेली नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालयात विप्रकृत मद्यार्कांवरील राज्य शासनाच्या नियंत्रणा विरोधात अद्यापही अनेक रिट याचिका दाखल होत आहेत. सदर याचिकां प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याबाबत या कार्यालया मार्फत संबंधित अधीक्षकांना कळविण्यात येते. परंतु आता मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या दि.१३.१२.२०१७ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल न करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेवून मा.उच्च न्यायालयाचे दि.१३.१२.२०१७ रोजीचे आदेश मान्य केलेले असल्याने अशा प्रकरणात प्रतिज्ञापत्र दाखल न करता याचिका खारिज करण्याबाबत मा.न्यायालयास संबंधित सरकारी वकीला मार्फत विनंती करण्याबाबत संबंधित अधीक्षकांनी त्यांच्या स्तरावर कार्यवाही करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संबंधित विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना सादर करावा. विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी अशा प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही अधीक्षकांकडून करण्यात आली असल्याची खात्री करुन त्याबाबतचा अंतिम अहवाल या कार्यालयास अवलोकनार्थ सादर करावा.

मा. आयुक्तांच्या मान्यतेने.

2/4/19

( विश्वनाथ इंदिसे )
सह आयुक्त (मळी व मद्यार्क),
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

दुसरा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००२३.

E-mail:excisedycommtp@gmail.Com., Tel. ०२२-२२६६३६८५.

# परिपत्रक

विषय :- औद्योगिक वापराकरीता
मद्यार्कांच्या निर्यातीबाबत.

क्रमांक:-डिवायएस ११२००५/४०९५९/चार. मुंबई. दि. २० ऑगस्ट. २०२०.

उपरोक्त विषया संदर्भात कळविण्यात येते की, सर्वश्री अर्स बायोफ्युअल विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.८५४८/२००४ या मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ अंतर्गत, विप्रकृत मद्यार्कावर राज्य शासनाचे अधिकार नसल्याने त्यासाठी अनुज्ञप्तीची आवश्यकता नाही अशा आशयाची याचिका मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली होती. अशा प्रकारच्या बऱ्याच याचिका इतर घटकांनी देखील मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या होत्या. त्या सर्व प्रकरणाची अंतीम सुनावणी मा.मुंबई उच्च न्यायालयात दिनांक.२९.०९.२०१७ रोजी होऊन सदर प्रकरणात मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.१३.१२.२०१७ रोजी अंतीम निकाल दिलेला आहे. मा.मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ मधील नियम २३ ते ६२ रद्द केलेले आहेत आणि मुंबई दारुबंदी कायदा अंतर्गत विप्रकृत मद्यार्कांच्या विक्री,खरेदी,वाहतुक,बाळगणे,साठवणे, Dehydration, आयात व निर्यात यासाठी अनुज्ञप्तीची आवश्यकता राहणार नाही, त्याचप्रमाणे शुध्द मद्यार्कांचा वापर औद्योगिक कारणासाठी करत असल्यास त्याचा दुरुपयोग होऊ नये याबाबत नियंत्रण ठेवण्याचे अधिकार राज्य शासनांस असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे विप्रकृत मद्यार्क तयार होईपर्यंत राज्य शासनाचे अधिकार आहेत त्यानंतर विप्रकृत मद्यार्क राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाहीत.

केंद्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने अधिसूचना क्र.२७/२०१६, दि.१४.०५.२०१६ अन्वये औद्योगिक (विकास व नियंत्रण) कायदा, १९५१ मध्ये सुधारणा केली असून औद्योगिक मद्यार्कांवर जे पेय मद्यासाठी वापरत नाहीत अशावर नियंत्रणाचे अधिकार केंद्रशासनाकडे असल्याचे अधिसूचित केले आहे. याबाबत सविस्तर स्पष्टीकरण केंद्र शासनाने पत्र क्र.२०(४५)/२०१४-SP-I(Pt.), दि.२१.१२.२०१६ अन्वये निर्गमित केलेले आहे.

केंद्र शासनाच्या दि.१४.०५.२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार काही राज्यांनी उदा.कर्नाटक, तामिळनाडू इत्यादी यांनी जलरहीत मद्यार्क इत्यादी विप्रकृत नसलेले तथापी पेय मद्याकरीता जात नसल्यास सर्व प्रकारच्या परवानग्या/परवाने देण्याचे रद्द केले आहे. म्हणजेच ही राज्यं औद्योगीक कारणासाठी मद्यार्क वापरणाऱ्या घटकांकडून कोणतीही अनुज्ञप्ती घेत नाहीत व अशा घटकांना कुठूनही विप्रकृत न केलेले मद्यार्क आणण्याची मुभा आहे. त्यासाठी कोणताही परवाना देत नाहीत. त्यामुळे या राज्यातील घटकांकडून शुध्द मद्यार्कांची किंवा जलरहित मद्यार्कांची मागणी औद्योगिक कारणांसाठी उदा. औषधे निर्मितीसाठी झाल्यास त्याची खात्री करुन अशा घटकांना आयात परवान्याशिवाय केवळ निर्यात परवाना दयावा व आयातदार घटकाच्या ठिकाणापर्यंत म्हणजेच अंतिम स्थानापर्यंत पथरक्षणाखाली मद्यार्क देण्यात यावे.

या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व परिपत्रकाची पोच द्यावी.

20/8/2020

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१. सर्व जिल्हाधिकारी, यांना सस्नेह.
२. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५. या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
६. अभिलेख शाखा ५ प्रती.